पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे - ४११ ०१८
फोन नं. ०२० - ६७३३३३३३
फॅक्स नं. ०२० - २७४२५६००
वेबसाईट:-
www.pcmcindia.gov.in

क्र.वैद्य/०९/कावि/६२६/२०२१ दि. २१/०२/२०२१

विषय:- कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाच्या प्रतिबंध व नियंत्रण याबाबतचे सुधारित आदेश.

संदर्भ:-१) शासन परिपत्रक क्रमांक-समय २०२०/प्र.क्र. ३५/१८ (रा.व.फा.) दिनांक०७/०४/२०२०
२) मा. विभागीय आयुक्त (पुणे) कार्या क्रासा.प्र.१/आरआर/१०२४/२०२० यांचे दिनांक २८/०८/२०२० रोजीचे पत्र.
३) अधिसूचना सार्वजनिक आरोग्यविभाग, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल मंत्रालय मुंबई, प्रामांक कोरोना २०२० /प्रक्र.५८/आरोग्य- ५, दिनांक १४मार्च २०२०
४) आपत्ती व्यवस्थापन कायदा२००५,
५) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७
६) महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र. महसूल व वनविभाग (DMU/2020/CR.92/DISM,1) दिनांक १७ एप्रिल २०२०, २१ एप्रिल, २९ जुन २०२०, ६ जुलै २०२० ३१ जुलै २०२०, ३१ ऑगस्ट २०२०, ३० सप्टेंबर २०२०, १४ ऑक्टोबर २०२०, २९ ऑक्टोबर २०२०, ३ नोव्हेंबर २०२०, १४ नोव्हेंबर २०२०, २३नोव्हेंबर २०२०, २७ नोव्हेंबर २०२०, २१ डिसेंबर २०२०, २४ डिसेंबर २०२०, २९ डिसेंबर २०२०, १४ जानेवारी २०२१

आदेश

ज्याअर्थी उपरोक्त संदर्भ क्र. ९ मधील आदेशान्वये राज्य शासनाने महाराष्ट्र राज्यात निर्बंध शिथील व टाळेबंदी टप्प्याटप्प्याने उठविणे (मिशन विगिन अगेन) संदर्भात कोविड १९ या आजाराच्या प्रसारास प्रतिबंधीत करण्यासाठी उपाययोजना व मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत,

ज्याअर्थी, सदर अधिनियमांतर्गत राज्यात कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी महाराष्ट्र कोविड -१९ उपाययोजना नियम २०२० अंमलात आलेले आहेत, महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० अन्वये कोविड-१९ च्या प्रसारास पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत केलेले आहे, साथरोग अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी राजेश पाटील, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करीत आहे.

१. पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सर्व शैक्षणिक संस्था, प्राथमिक व माध्यमिक शाळा महाविद्यालये यांचे नियमित वर्ग तसेच खाजगी शिकवणी वर्ग या आदेशाच्या दिनांकापासून दिनांक २८ फेब्रुवारी २०२१ पर्यंत पूर्णतः बंद राहतील.
२. पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सर्व अभ्यासिका ५०% क्षमतेने (Social Distancing) व Sanitization चे नियम काटेकोरपणे पाळून सुरू राहतील.
३. मंगल कार्यालय (खुले अथवा बंदिस्त) या ठिकाणी २०० व्यक्तींच्या किंवा आसन क्षमतेच्या ५०% क्षमता यापैकी जे कमी असेल तेवढ्या उपस्थितीत लग्न समारंभ करणेस परवानगी राहील. तसेच ज्यांचेकडील लग्न आहे त्यांनी पोलिसांचे ना-हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील.

४. पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मंगल कार्यालये, हॉल, लॉन्स, सांस्कृतिक सभागृह, सर्व सामाजिक, धार्मिक, राजकीय, क्रीडा, मनोरंजन, सांस्कृतिक, शैक्षणिक उपक्रम, सभा, संमेलन, नाट्यगृह, चित्रपटगृहे, शॉपिंग मॉल, धार्मिक स्थळे, उद्याने व तत्सम मोठ्या संख्येने लोक एकत्र येवू शकतील अशा प्रकारचे कार्यक्रमाचे ठिकाणी, सर्व नागरिकांनी संचार करताना मास्क व सॅनिटायझरचा वापर करणे बंधनकारक आहे. त्याच प्रमाणे यापूर्वी वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार उपरोक्त नमूद सर्व ठिकाणी नागरिकांची गर्दी होणार नाही याची दक्षता संयोजकांनी घ्यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मनपा कार्यालये, सरकारी व खाजगी कार्यालयांमध्ये मास्क व सॅनिटायझरचा वापर करणे बंधनकारक राहील.

५. सर्व हॉटेल, रेस्टॉरंट, बार, फूड कोर्ट रात्री ११:०० वाजेपर्यंतच सुरु राहतील.

६. पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात कोणत्याही व्यक्तीस अत्यावश्यक कारण/ सेवा वगळता दिनांक २२ फेब्रुवारी २०२१ पासून रात्री ११:०० ते सकाळी ०६:०० यावेळेत संचार करणेस प्रतिबंध असेल. यामधून जीवनावश्यक वस्तूंचा (दुध, भाजीपाला, फळे इ.),वृत्त पत्र सेवा व अत्यावश्यक सेवा पुरवणारे आस्थापना/व्यक्तींना व त्यांच्या वाहनांना वगळण्यात येत आहे.

७. पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात नागरिकांनी संचार करताना मास्कचा वापर करणे अनिवार्य असून सामाजिक अंतर (Social Distancing) व सॅनिटायजेशनच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील.

८. संदर्भीय आदेशान्वये वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश / मार्गदर्शक सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

कोविड-१९ च्या प्रतिबंधासाठी या कार्यालयाद्वारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशांचे, मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणारी व्यक्ती आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ५१ ते ६० तसेच भारतीय दंड संहितेचे कलम १८८ नुसार अन्य कायदेशीर तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहील.

सदर आदेश दि. २१.०२.२०२१ पासून पुढील आदेशापर्यंत पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात लागू राहतील.

सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्क्यानिशी दि. २१. ०२ .२०२१ रोजी दिलेला आहे.

सही/-<br>
(राजेश पाटील)<br>
आयुक्त<br>
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,<br>
पिंपरी ४११ ०१८.

स्थळ प्रतिवर मा. आयुक्त सो यांची स्वाक्षरी असे.

For (अजित पवार)<br>
अतिरिक्त आयुक्त (२)<br>
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,<br>
पिंपरी ४११०१८.

प्रत माहितीस्तव सादर –

१) मा. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे<br>
२) मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण<br>
३) मा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त कार्यालय, चिंचवड<br>
४) सर्व क्षेत्रिय अधिकारी व संबंधित विभाग प्रमुख

यांचेकडे माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित